**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे उज्ज्वल यश

**पाटण, दि. २१ :** कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षेत यश मिळवले. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणचे हे प्रथम वर्ष असून पहिल्याच वर्षी विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी जून २०२३ मध्ये घेतलेल्या हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी आणि सर्टिफिकेट कोर्स इन फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी या परीक्षेत नीलेश खाडे याने ७८ टक्के गुण मिळवून सातारा विभागात प्रथम क्रमांक मिळविला.

अभिषेक आंधळे याने ७६.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, वेदांतिका पवार हिने ७५.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

त्याचबरोबर सर्टिफिकेट कोर्स इन फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस या परीक्षेत धनराज देसाई याने ८०.५० टक्के गुण मिळवून प्रथम, भावना सूर्यवंशी हिने ७५ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि अनिकेत यादव याने ७३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक असे यश संपादन केले आहे. इतर विद्यार्थ्यांनी देखील या दोन्ही अभ्यासक्रमाच्या परीक्षेत सर्वोत्तम यश संपादन केले आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणचे हे प्रथम वर्ष असून पहिल्याच वर्षी विद्यार्थ्यांनी हे उत्तुंग यश संपादन केले असल्याने सर्व संस्थेतून व पालक व शिक्षक वर्गातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे. सातारा जिल्ह्यातील प्रथम मानांकित कॉलेज असून अल्पावधीत कॉलेजने हे यश प्राप्त केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी फक्त परीक्षेतच नाही तर चांगल्याप्रकारे स्टार हॉटेलमध्ये ट्रेनिंग देखील करण्याचे यश मिळवले आहे.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य चेतन सावंत, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर सपकाळ, प्रा. भरत कांबळे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल त्यांचे विक्रमसिंह पाटणकर, जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण यांच्यासह सर्व सदस्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.

दैनिक - ऐक्य
दिनांक - 22/8/2023